माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

## अपील क्रमांक : १७१५/२०२२

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. मंगेश लक्ष्मणराव कुंभारे, फ्लॅट नं. एफ-१, केयुर रेसिडेन्सी, व्दारका नगरी, तुकूम, चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर | आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, चिमूर आगार, चिमूर ता. चिमूर जि. चंद्रपूर | विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर |

## सुनावणी दिनांक :- १७/१२/२०२४

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : २८.०६.२०२२

(२) द्वितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ३०.०६.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती दिली नसल्यामुळे, .

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १६.०३.२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २१.०३.२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : ऑक्टोंबर १९९९ देय नोव्हेंबर १९९९ पावेतो.

(४) **जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** कामगार करार दिनांक ०१.०४.१९९६ ते ३१.०३.२००० मधील कलम नंबर ११४ "कामगार करारापोटी निव्वळ देय होणाऱ्या एकंदर थकबाकी रकमेपैकी ५% इतकी रक्कम प्रत्येक कामगारांना थकबाकीतून कापून ती रक्कम युनियन फंड म्हणुन मान्यताप्राप्त संघटनेकडे सर्व तपशीलासह वर्ग करण्यात येईल." नुसार माझी कपात केलेली रक्कम व आजमितीस व्याजासह रक्कम किती आहे, याबाबत माहिती मागितलेली आहे.



माहिती आयोग खंडपीठ

(५) **जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१.०४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, सदर माहितीला २२ वर्ष झालेले आहे व माहितीचे कागदे उधळीने नष्ट केल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध होऊ शकत नाही, असे अपिलार्थीस कळविले.

**४. प्रथम अपील –**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २१.०४.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २३.०४.२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : कोणतीही माहिती अथवा पत्र मिळाले नाही.

(४) **अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१.०५.२०२२ रोजी सुनावणी घेवून, जन माहिती अधिकारी, यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही ज्या स्वरुपात (उधळीचे प्रादुर्भावामुळे) उपलब्ध आहे त्या स्वरुपातील माहितीची झेरॉकक्स प्रत मोफत पुरवावी व झेरॉक्स प्रत काढणे शक्य नसल्यास सदर अभिलेख पाहणीची संधी अपिलार्थी यांना १० दिवसाचे मुदतीत द्यावी, असे आदेशीत करुन अपील निकाली काढण्यात येत आहे.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा –**

१) आज सुनावणी दरम्यान प्राधिकरणाच्या वतीने असे स्पष्ट केले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१.०४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, सदर माहितीला २२ वर्ष झालेले आहे व माहितीचे कागद उधळीने नष्ट केल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध होऊ शकत नाही, असे असे नमुद केले. तसेच अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१.०५.२०२२ रोजी सुनावणी घेवून, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही ज्या स्वरुपात (उधळीचे प्रादुर्भावामुळे) उपलब्ध आहे त्या स्वरुपातील माहितीची झेरॉक्स प्रत मोफत पुरवावी व झेरॉक्स प्रत काढणे शक्य नसल्यास सदर अभिलेख पाहणीची संधी अपिलार्थी यांना १० दिवसाचे मुदतीत द्यावी, असे आदेशीत केले.

२) अपिलार्थी यांनी आज सुनावणी दरम्यान कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे नमुद केले आहे.

**६. निष्कर्ष** – सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१) अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१.०४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, सदर माहितीला २२ वर्ष झालेले आहे व माहितीचे कागद उधळीने नष्ट केल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध होऊ शकत नाही, असे अपिलार्थीस कळविल्याचे आढळून येते. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या आदेशात अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही ज्या स्वरुपात (उधळीचे प्रादुर्भावमुळे) उपलब्ध आहे त्या स्वरुपातील माहितीची झेरॉक्स प्रत मोफत

पुरवावी व झेरॉक्स प्रत काढणे शक्य नसल्यास सदर अभिलेख पाहणीची संधी अपिलार्थी यांना १० दिवसाचे मुदतीत द्यावी, असे आदेशीत केलेले आढळून येते.

२) अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे आढळून येत नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी झाल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाचे अंमलबजावणी करणे अपेक्षित ठरते.

सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, चिमूर आगार, चिमूर ता. चिमूर जि. चंद्रपूर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६.०३.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भात मागणी केलेली माहिती ही ज्या स्वरुपात (उधळीचे प्रादुर्भावामुळे) उपलब्ध आहे त्या स्वरुपातील माहितीची झेरॉक्स प्रत मोफत पुरवावी व झेरॉक्स प्रत काढणे शक्य नसल्यास सदर अभिलेख पाहणीची संधी अपिलार्थी यांना १० दिवसाचे मुदतीत द्यावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

२. या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १७.१२.२०२४**

जावक क्रमांक 6660 ---------- दिनांक 13 FEB 2025 ----------